दि. ५ फेब्रुवारी २०२६
गुरुवार
वर्ष ४ थे
अंक ९४
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक
अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**


आजचे पंचाग

- दिनांक : ५ फेब्रुवारी २०२६
- वार : गुरुवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : चतुर्थी तिथी (६ फेब्रुवारी रात्री १२:२२ पर्यंत) त्यानंतर पंचमी तिथी
- नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी नक्षत्र (रात्री १०:५६ पर्यंत) त्यानंतर हस्त नक्षत्र
- योग : सुकर्मा योग (६ फेब्रुवारी रात्री १२:०३ पर्यंत) त्यानंतर धृति योग
- करण : भाव करण (दुपारी १२:१० पर्यंत) त्यानंतर बलवा करण
- चंद्र राशी : कन्या राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी ०२:१८ ते दुपारी ०३:४३ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१५
- सूर्योदय : सकाळी ०७:१३
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३३
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

शक्तीपीठ महामार्गाच्या आराखड्यात बदल

मुंबई : राज्यातील साडेतीन शक्तीपीठांना जोडणाऱ्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला कोल्हापूर जिल्ह्यातून तीव्र विरोध झाल्यानंतर राज्य सरकारने अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकरी, स्थानिक नागरिक आणि विविध संघटनांच्या आंदोलनाची दखल घेत महामार्गाचा मार्ग बदलण्यात आला असून, कागल आणि हातकणंगले तालुक्यांचा मोठा भाग वगळण्यात आला आहे. या बदलामुळे महामार्ग सातारा जिल्ह्यातून जाणार असला तरी प्रकल्पाच्या एकूण खर्चात सुमारे १५ हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

शक्तीपीठ महामार्गाचा मूळ आराखडा जाहीर झाल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, हातकणंगले, भुदरगड, आजरा आणि चंदगड



तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध झाला होता. शेतजमीन मोठ्या प्रमाणावर संपादित होणार असल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. २०२४ च्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विरोध अधिक तीव्र झाला होता. या पार्श्वभूमीवर सरकारने महामार्गाच्या आखणीत बदल करण्याचे आश्वासन दिले होते.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) तयार केलेल्या सुधारित आराखड्यानुसार कागल आणि हातकणंगले तालुक्यांचा मोठा भाग महामार्गाच्या मार्गातून वगळण्यात आला आहे. याशिवाय सिंधुदुर्ग, कोल्हापूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांतील मार्गातही बदल करण्यात आले आहेत. नव्या आराखड्यानुसार हा महामार्ग यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग अशा १३ जिल्ह्यांतून जाणार आहे. सातारा जिल्ह्यातील माण आणि खटाव तालुक्यांचा या महामार्गात नव्याने समावेश करण्यात आला आहे. ३९५ गावांमधून जाणार महामार्ग

मार्ग बदलल्यामुळे महामार्गाची लांबीही वाढली आहे. आधी ८०२ किलोमीटर असलेला महामार्ग आता सुमारे ८५६ किलोमीटर लांबीचा होणार आहे. तसेच, आधी ३५० गावांमधून जाणारा हा प्रकल्प आता सुमारे ३९५ गावांमधून जाणार आहे. परिणामी भूसंपादनाचा व्याप वाढून सुमारे ८ हजार ५०० हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. या भूसंपादनाचा संपूर्ण खर्च राज्य सरकार उचलणार असून त्यासाठी कर्ज उभारण्याची तयारी करण्यात आली आहे.

(पान २ वर)

राहुल गांधींची वक्तव्ये देशहिताला धक्का पोहोचवणारी

मुंबई : काँग्रेस नेते राहुल गांधी हे गंभीर आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर तथ्याधारित चर्चा करण्याऐवजी सातत्याने आरोपांचे राजकारण करत असून, देश, सेना आणि शहिदांना बदनाम करण्यातच त्यांना रस असल्याचा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. देशाच्या सुरक्षिततेशी आणि प्रतिष्ठेशी संबंधित मुद्द्यांवर जबाबदार भूमिका अपेक्षित असताना राहुल गांधींची वक्तव्ये देशहिताला धक्का पोहोचवणारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी यांना सभागृहात चर्चा करायची नसून केवळ खोटे आरोप करायचे आहेत. अशा प्रकारची वक्तव्ये जबाबदार नेतृत्वाला साजेशी नाहीत. देश आणि सेनेविषयी वक्तव्य करताना आवश्यक ते गांभीर्य आणि संवेदनशीलता दाखवली जात नसल्याचा



आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, राज्यातील लाडकी बहीण योजनेला अजित पवार यांचे नाव देण्याच्या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पहिल्यांदाच स्पष्ट भूमिका मांडली. या विषयावर विविध स्तरांतून मागण्या येत असल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र कोणताही निर्णय घाईघाईने न घेता सर्व बाबींचा सखोल विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना असून, तिच्याशी संबंधित कोणताही बदल चर्चेतून आणि सामूहिक निर्णयातूनच केला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. योजनेला कोणाचे नाव द्यावे, यापेक्षा तिचा लाभ महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतो आहे की नाही, हा खरा मुद्दा असल्याचे त्यांनी नमूद केले.

एकीकडे सरकार लाडकी बहीण योजनेसारख्या सामाजिक योजनांबाबत संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने निर्णय घेण्याच्या भूमिकेत आहे,

(पान २ वर)

मॉडेलच्या मैत्रिणीला सिड अटॅकची धमकी

जाब विचारायला गेल्यामुळे मॉडेलवर जीवघेणा हल्ला

मुंबई : मुंबईचे उपनगर असलेल्या अंधेरी पश्चिम भागातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अंधेरीमधील नावाजलेला परिसर असलेल्या लोखंडवाला येथे एका मॉडेलच्या अंगावर कार घालण्याचा प्रयत्न केल्याने सगळीकडेच एकच खळबळ उडाली आहे. ही घटना साधारण रात्री साडेनऊच्या सुमारास घडली; घडलेला संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे .

मिळालेल्या माहितीनुसार,




अंधेरीतीलमधील लोखंडवाला परिसरात एका मॉडेलच्या अंगावर कार घालून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. 'अरिना' इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ हा प्रकार घडला असून.याप्रकरणी ओशिवरा पोलिसांनी मोहम्मद शकील शेख (वय २९) या तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मॉडेल तरुणी आणि आरोपीमध्ये सोशल मीडियावर वाद झाल्यामुळे हा प्रकार घडला आहे. आरोपीने काही दिवसांपूर्वी मॉडेलच्या मैत्रिणीला स्नॅपचॅटवर सिड हल्ल्याची धमकी दिली होती. या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी मॉडेलने आरोपीला गाठले असता, रागाच्या भरात आरोपीने तिला इमारतीच्या बाहेर

(पान २ वर)

सरकारी सुट्टी पण बँकिंग सेवा सुरू राहणार

मुंबई : आर्थिक वर्ष २०२५-२६ चा शेवटचा दिवस असलेल्या ३१ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी सरकारी व्यवहारांवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्या दिवशी सरकारशी संबंधित बँकिंग सेवा सुरू ठेवण्याचे निर्देश आरबीआय कडून देण्यात आले आहेत.



रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार, केंद्र आणि राज्य सरकारांच्या वतीने व्यवहार करणाऱ्या बँकांच्या (राष्ट्रीयकृत बँका अर्थात नॅशनलाइज्ड बँका) शाखा ३१ मार्च रोजी सामान्य नागरिकांसाठी खुल्या राहणार आहेत. या निर्णयामुळे वित्तीय वर्ष संपताना होणारे सरकारी आर्थिक व्यवहार वेळेत पूर्ण करता येणार आहेत.

आरबीआय ने स्पष्ट केले आहे की, भारत सरकारच्या विनंतीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. कारण वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिवशी कर संकलन, शासकीय देयके, अनुदान वितरण, विभागीय हस्तांतरणे तसेच इतर आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर होतात. अशा वेळी बँक सेवा बंद राहिल्यास लेखाजोखा आणि सेटलमेंट प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात.

या निर्णयानुसार, कर भरणे, चालान जमा करणे, सरकारी खात्यांशी संबंधित पेमेंट्स तसेच इतर शासकीय बँकिंग

(पान २ वर)

एक्सप्रेवेवर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी अन् २५ किलोमीटर पर्यंत रांगा



लोणावळा : मुंबईपुणे द्रुतगती महामार्गावर मंगळवारी सायंकाळी घडलेल्या एका अपघातामुळे संपूर्ण मार्गावर वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. आडोशी बोगद्याच्या परिसरात ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर उलटल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव महामार्गावरील वाहतूक दीर्घकाळासाठी थांबवावी लागली. या घटनेचा परिणाम म्हणून महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, अनेक प्रवासी अनेक तास अडकून पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारा हा टँकर एका तीव्र वळणावर चालकाच्या नियंत्रणाबाहेर गेला आणि बोगद्याच्या प्रवेशाजवळ पलटी झाला. टँकरमध्ये असलेल्या वायूची गळती सुरू झाली. संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने खबरदारीचा उपाय म्हणून मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे रोखली, तर पुण्याकडील वाहतूकही मर्यादित स्वरूपात चालू ठेवण्यात आली.

अपघातानंतर सुमारे आठ तास महामार्गावर वाहतूक पूर्णतः ठप्प होती. मध्यरात्रीनंतर धोका काही प्रमाणात कमी झाल्यानंतर टँकर बाजूला घेण्यात आला आणि एका लेनवरून वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र, वाहतुकीचा वेग अत्यंत संथ असल्याने वाहनांच्या रांगा अजूनही कमी झालेल्या नाहीत.

या घटनेमुळे मुंबईपुणे द्रुतगती मार्गासह जुना पुणेमुंबई महामार्गावरही मोठ्या प्रमाणात कोंडी झाली आहे. काही ठिकाणी वाहनांच्या रांगा २० ते २५ किलोमीटरपर्यंत पोहोचल्याची माहिती आहे. अनेक प्रवासी पहाटेपासून एकाच ठिकाणी अडकून असल्याने संताप व्यक्त करत आहेत.

(पान २ वर)

सर्वसामान्यांसाठी सुरू केलेली एकही योजना बंद होणार नाही

बार्शी : राज्याच्या तिजोरीवर सर्वप्रथम अधिकार हा शेतकरी, कष्टकरी, युवक आणि महिलांचा असल्याचे ठाम प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बार्शी येथे झालेल्या जाहीर प्रचार सभेत केले. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या सभेत मार्गदर्शन करताना त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, या घटकांसाठी सुरू करण्यात आलेली एकही



योजना कधीही बंद होणार नाही. कोणीही कितीही विरोध केला, कोर्टात गेले, आरोप केले तरी सरकारने सुरू केलेल्या योजना अखंड सुरू राहतील, हा शब्द त्यांनी जनतेला दिला.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आमदार दिलीप सोपल यांच्यावर भरभरून स्तुतीसुमने उधळली. आमदार कसा असावा, तर दिलीप सोपल यांच्यासारखा असावा. ते सगळ्यांचे मित्र आहेत, शत्रू कोणाचाही नाही. सहा-सात वेळा निवडून येणं हा योगायोग नाही, तर वर्षानुवर्षांच्या कामाची पोचपावती आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. भर उन्हातही लोकांची गर्दी पाहून सोपल साहेबांच्या कामाची जाणीव होते, असे सांगत पुढील काळात ते पुन्हा एकदा मोठ्या फरकाने विजयी होतील आणि मंत्रिमंडळात त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

(पान २ वर)

अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी १२ हेक्टर जागा मंजूर

मुंबई : अमरावती जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे, अमरावती जवळील आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जमिनीचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे सोपवण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली. याबाबतचा निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे.

या जागेवर १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या महाविद्यालयाला संलग्न ४३० रुग्णखाटांचे अद्ययावत रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या नियोजित प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक असल्याचे आदेशात म्हटले आहे. जमीन 'भोगवटादार वर्ग-२' या धारणाधिकाराने मूल्यरहित

(पान २ वर)

शरदचंद्र पवार व इतर ज्येष्ठ नेत्यांचा अनादर करणाऱ्या भाजपच्या मंडळींचा अहंकार उतरवा

किल्लारीच्या सभेतून माजी मंत्री आमदार अमित देशमुख कडाडले



दै. अदिती एक्सप्रेस

किल्लारी (औसा) - भूकंपग्रस्त किल्लारीला तालुक्याचा दर्जा देण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांनी आश्वासन दिले होते ते आश्वासन ३३ वर्षानंतर मी दुसरा पवार पूर्ण करणार आहे असे विधान औसा येथील स्थानिक आमदारांनी येथे केल्याचे मी ऐकले आहे, खरे तर हे सत्तेच्या अहंकारातून केलेले वक्तव्य आहे. हा वाढत चाललेला अहंकार उतरवण्याची संधी आपणाला जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने आली आहे. येत्या ७ तारखेला, स्वच्छ प्रतिमेच्या काँग्रेस उमेदवारांना मतदान करून अहंकारी मंडळींना धडा शिकवा असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जोरदार प्रहार केला.

लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ निमित्ताने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि यांच्या अध्यक्षतेखाली आज बुधवार दि.०४ फेब्रुवारी रोजी सकाळी औसा तालुक्यातील किल्लारी जिल्हा परिषद गट,व गण तसेच तळणी पंचायत समिती गणातील काँग्रेस आघाडी उमेदवार यांच्या प्रचारार्थ बाजार मैदान किल्लारी या ठिकाणी जाहीर प्रचार सभा पार पडली.

येत्या ७ तारखेला, स्वच्छ प्रतिमेच्या काँग्रेस उमेदवारांना मतदान करून अहंकारी मंडळींना धडा शिकवा असे आवाहनही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित

(पान २ वर)

मध्यमवर्गीय शेतकऱ्यांची लवकरच कर्जमाफी - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



दै. अदिती एक्सप्रेस

औसा- खरी कर्जमाफी ही मध्यमवर्गीय व गरजू शेतकऱ्यांसाठीच असणार आहे, असे स्पष्ट आणि ठाम प्रतिपादन राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लामजना येथे झालेल्या प्रचार सभेत केले. कर्जमाफीबाबत पसरवले जात असलेले गैरसमज दूर करत त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.मंत्री बावनकुळे म्हणाले की, मध्यमवर्गीय शेतकऱ्यांची कर्जमाफी लवकरच जाहीर होणार असून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कर्जमाफीचा लाभ खरोखरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनाच मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मंगळवारी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या प्रचार सभेत ते औसा तालुक्यातील लामजना येथे बोलत होते.यावेळी मंचावर माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर भाजपाचे जिल्हाध्यक्ष व बसवराज पाटील आमदार अभिमन्यू पवार, सभापती चंद्रशेखर सोनवणे, ॲड. परीक्षीत पवार आदी सह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री बावनकुळे यांनी गायरान, बंजारा वस्ती व वडार समाजासाठी मोठी घोषणा केली. अभिमन्यू, तुम्ही सर्व गावांची यादी तयार करा. मी एक शासन आदेश काढून गायरानवर, बंजारा वस्तीत किंवा इतर वस्तींमध्ये राहणाऱ्या सर्व कुटुंबांचे कबाले वाटप करून देण्याची जबाबदारी घेतो, असे त्यांनी जाहीर केले. घरकुलासाठी कमाल मर्यादा न मिळालेल्या कुटुंबांनाही न्याय दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.समाजाच्या शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री बळीराजांचे योजना तयार करण्यात आली असून, त्यासाठी अनेक लोकप्रतिनिधींचे योगदान लाभल्याचे त्यांनी नमूद केले. लातूर जिल्ह्यातील आमदार अभिमन्यू पवार व संभाजी पाटील निलंगेकर हे राज्यातील उत्कृष्ट आमदारांमध्ये असून, विकसित लातूर या संकल्पनेतून जिल्ह्याचा

(पान २ वर)

अंकल सॅमचा मदतीचा हात

सगळ्या जगावर टॅरिफ युद्ध लादणारे अंकल सॅम यांनी अखेर नमते घेतले. भारतावर लादलेले ५०% टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांच्या या घोषणेमुळे भारत-अमेरिकेत होणाऱ्या मुक्त व्यापार कराराचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेने भारतावर लादलेला टॅरिफ २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणणे आणि दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार समझोता करण्यासंदर्भात ठोस प्रगती करणे या दोन्ही गोष्टी भारतासाठी अत्यंत मोलाच्या आणि उपयुक्त आहेत. या करारावर उभय देशांमध्ये बोलणी झाली ती अत्यंत सकारात्मक. त्यांना लवकरच अंतिम स्वरूप देण्यात येईल असे सांगण्यात येते. अर्थात ट्रम्प यांनी भारतावर लादलेला टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याचे जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ट्रम्प यांचे आभार मानले. आता याचा फायदा कोणत्या क्षेत्रांना होईल याचा विचार केला तर भारतातील वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू आणि कार्पेट्स यांच्या निर्यातीला यातून मोठा लाभ होणार आणि यापेक्षाही मोठा फायदा हा की या करारामुळे मध्यम मुदतीचा मॅक्रो बुस्ट व्यापार आणि भांडवली ओघातून मिळेल. भारताला आता रशियाकडून तेलाची खरेदी कमी करावी लागणार आणि ते आवश्यक होते. कारण अमेरिकेला नाराज करून भारताला तेलाची खरेदी परवडणार नव्हती आणि त्या बदल्यात व्हेनेझुएलाकडून तेलाची खरेदी करावी लागेल. भारत अमेरिकेविरुद्धचे भारताचे टॅरिफ आणि नॉन टॅरिफ अडथळे शून्यावर आणले जातील. अर्थात काही प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. ट्रम्प प्रशासनाने भारतावर अनेकदा आरोप केला की भारत रशियाकडून तेल खरेदी वाढवून रशियाच्या युद्धाला अप्रत्यक्ष निधी पुरवत आहे. ट्रम्प यांनी दावा केला, की मोदी यांनी रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यास आणि व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्यास संमती दर्शवली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, की वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेमुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आणि आता अनेक महिन्यांच्या वाटाघाटीनंतर त्यात स्पष्टता आली. पण सर्वात मोठा लाभ हा आहे, की टॅरिफ कपातीनंतर भारतातील निर्यातदारांना अमेरिकेला निर्यात वाढवण्याची आशा आहे. इतकेच नव्हे तर भारतातून सीफुड निर्यातही वाढण्याची शक्यता आहे.

या कराराचा दोन्ही देशांना फायदा आहे. भारत आता अमेरिकेकडून पेट्रोलियम, संरक्षण आणि औषधे तसेच दूरसंचार उत्पादने आणि विमाने खरेदी करेल. यामुळे भारताच्या संरक्षण सिद्धतेत वाढ होईल आणि अमेरिकन ऊर्जा आणि कोळसा भारत खरेदी करू शकतो याचा फायदा संबंधित क्षेत्रांना होईल आणि भारतीय शेतकरी यांचे जीवनमान सुसह्य होईल. अर्थात हा पहिला टप्पा आहे आणि येत्या काही महिन्यांत अधिक व्यापक करारावर वाटाघाटी केल्या जातील. भारत-अमेरिका व्यापार करारातील संदिग्धता आता नष्ट झाल्यामुळे भारताची निर्यात वाढेल. पण यासोबतच ट्रम्प यांनी एचवनबी व्हिसा शुल्क वाढवल्यामुळे आणि त्यांच्या अमेरिका फर्स्ट या धोरणामुळे इमिग्रेशन धोरण कडक केल्यामुळे भारतीयांना कामावर ठेवणे अमेरिकेतील उद्योगांना शक्य नाही. सेवा क्षेत्रातील धोरणाबाबत अस्पष्टता कायम आहे. भारत-अमेरिका हे दोन्ही देश राजकीय विषयांवर तोडगे काढतात; परंतु महत्त्वाचे आर्थिक प्रश्न तसेच ठेवतात असे चित्र निर्माण झाले. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे मेड इन इंडिया उपक्रमासाठी लाभदायक बाब ठरली आहे असे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केले. कारण आता १८ टक्के टॅरिफ परस्पर आकारला जाईल. यामुळे दोन्ही देशांना याचा लाभ होईल आणि त्यामुळे ही आनंदाची बातमी आहे, असे त्यानी म्हटले आहे. अर्थात या घटनेमुळे एकूणच भारतीय अर्थजगतात आनंददायी वातावरण असले तरीही राजकीय हालचाली वाढल्या. काँग्रेसने मोदी सरकारवर तीव्र हल्ला चढवला असून काँगेस नेते रमेश यांनी शेलक्या शब्दांत टीका केली, की वॉशिंग्टनमध्ये मोगँबो खूश हुआ. यातील उपरोध लक्षात यावा असा आहे. पण भारत रशियापासून दूर गेलेला नाही.

भारताने अमेरिकेशी केवळ करार केला आहे आणि तो दोन्ही देशांच्या फायद्याचा आहे. जयराम रमेश यांनी टीका केली, की हा करार खरेच इतका जर मोठा असता तर त्याची घोषणा भारताने का केली नाही. पण रमेश यांच्या टीकेकडे लक्ष देण्याची गरज नाही. कारण या करारामुळे भारतातील निर्यातदारांना आणि इतर अनेक व्यापाऱ्यांना फायदा होणार आहे. मोठ्या निर्णयांची माहिती आम्हाला अमेरिकेकडून का मिळत आहे असा त्यांचा सवाल आहे. पण भारताने यापूर्वीही अमेरिकेला कठोर उत्तर दिले होते आणि भारत अमेरिकेच्या आहारी नाही हे स्पष्ट केले होते. खरे कारण आहे ते टॅरिफ अस्त्रामुळे भारत संतप्त झाला होता आणि त्याने अमेरिका नाही तर नाही युरोपशी ट्रेड वाटाघाटी सुरू केल्या. यामुळे ट्रम्प यांनी १८ टक्के टॅरिफ लावण्याची तयारी दर्शवली. ट्रम्प यांनी भारतासमोर गुडघे टेकले. यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार ५०० अब्ज डॉलर इतका वाढू शकतो. अमेरिकन कंपन्या भारतात याव्यात अशी भारताची इच्छा आहे आणि भारताने म्हणूनच कंपन्यांसाठी टॅक्स होलिडे वाढवला. ट्रम्प यांना भाराताशी हा करार करण्याशिवाय पर्यायच नव्हता. भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय करार होणे हा ऐतिहासिक क्षण आहे हे मत राजनाथ यांनी व्यक्त केले. पण यापेक्षा मोदी यांनी अशी खेळी खेळली आहे, की चीनची अडचण वाढली. आता चीनचा प्रशांत महासागरात प्रभाव कमी होऊन भारताचे सामर्थ्य वाढले. त्यामुळे चीनचा संताप होणे साहजिक आहे. इतकेच नव्हे तर भारत आणि अमेरिका यांच्यातील करारामुळे क्वाड अंतर्गत चीनच्या सीमावर्ती भागात तणाव वाढला आहे.

चीनची प्रशांत महासागरात मनमानी करण्याची प्रवृत्ती वाढली होती तिला आळा बसला. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या चीनमधून आपला व्यवसाय अन्यत्र वळवत आहे आणि यामुळेही चीनच्या आर्थिक वर्चस्वाला हादरा बसत आहे. त्यापेक्षा आणखी एक महत्त्वाचा परिणाम असा, की भारत अमेरिका सहकार्यामुळे चीनच्या सीमेवरील हालचालींवर मर्यादा येत आहे. भारत आता अधिक सतर्क झाल्यामुळे चीनला दडपशाही करणे अवघड झाले. भारत आता जागतिक दक्षिणमध्ये आपला प्रभाव वाढवत असल्यामुळे चीनची आशियातील एकाधिकारशाही कमी होत आहे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले, की विरोधक टीका करत होते. पण आम्ही संयम राखला आणि आज त्याचे परिणाम देशासमोर आहे. उत्पादन वाढवा, दर्जेदार उत्पादन तयार करा आणि देशाला विकसित भारत बनवण्याच्या दिशेने मदत करा असे आवाहन त्यानी केले. हाच या संपूर्ण विवेचनाचा मूलमंत्र आहे.

कासार सिरशी व किल्लारी नवे तालुके होणार

२०२७ नंतर प्रत्यक्ष अस्तित्वात येणार : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

औसा- औसा तालुक्यातील किल्लारी व निलंगा तालुक्यातील कासार सिरशी हे दोन नवे तालुके २०२७ नंतर प्रत्यक्ष अस्तित्वात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी औसा तालुक्यातील लामजना येथे झालेल्या प्रचार सभेत केली. गेल्या सुमारे ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मंत्री बावनकुळे म्हणाले की, किल्लारी व कासार सिरशी तालुक्यांची निर्मिती झाल्यानंतर महसूल, पोलीस व इतर प्रशासकीय विभागांचे सर्व कामकाज अधिक सुलभ व गतिमान होणार आहे. नागरिकांना शासकीय कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणीच सुविधा उपलब्ध होतील, त्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या घोषणेमुळे किल्लारी, कासार सिरशी तसेच निलंगा तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, आगामी काळात या भागाच्या प्रशासकीय विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

ते सहा गावे पुन्हा निलंगा तालुक्यात समाविष्ट यावेळी त्यांनी निलंगा तालुक्यातील सहा गावे सांगवी, जेवरी, बामणी, धानोरा, माळेगाव आणि शिंगणाळ पुन्हा निलंगा तालुक्यात समाविष्ट करण्याबाबत माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, या गावे निलंगा तालुक्याशी जोडण्यासाठी पुढील महिन्यातच अध्यादेश जारी करण्यात येईल आणि निवडणुकीनंतर संबंधित आदेश अंमलात आणला जाईल. नागरिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून हा निर्णय घेतला जात आहे असे यावेळी बोलताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून

शक्तीपीठ...

त्यामुळे प्रकल्पाचा एकूण खर्च आधीच्या ८६ हजार कोटी रुपयांवरून वाढून सुमारे १ लाख १ हजार कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. वैशिष्ट्ये काय?

शक्तीपीठ महामार्ग हा मुंबईपुणे द्रुतगती मार्ग आणि समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार महामार्ग असणार आहे. या महामार्गामुळे वाहनचालकांना वेगवान व सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळेल, तसेच राज्याच्या पूर्व आणि पश्चिम भागांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा सरकारचा दावा आहे.

एमएसआरडीसीने तयार केलेला सुधारित प्रस्ताव राज्य सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्याची तपासणी सुरू आहे. अंतिम मंजुरीनंतर भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाला गती दिली जाणार आहे.

राहुल गांधींची...

तर दुसरीकडे विरोधकांकडून केवळ आरोपांचे राजकारण सुरू असल्याचा अप्रत्यक्ष टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी लगावला.

मॉडेलच्या मैत्रिणीला...

बोलावले आणि तिच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला.

सुदैवाने या सर्व घटनेमध्ये मॉडेल तरुणी ही किरकोळ जखमी झाली आहे. मॉडेलच्या अंगावर जेव्हा आरोपी कार घालत होता तेव्हा तिला वाचवण्यासाठी आजूबाजूच्या नागरिकांनी तिला मदत करण्याच्या प्रयत्न केला असता आरोपीने त्यांच्यावरही कारद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

सरकारी सुट्टी...

सेवा ३१ मार्च रोजी उपलब्ध राहतील. त्यामुळे करदाते, व्यापारी, उद्योग आणि सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रिझर्व्ह बँकेने सर्व संबंधित बँकांना ग्राहकांना याबाबत पूर्वसूचना देण्याचेही आदेश दिले आहेत, जेणेकरून शेवटच्या दिवशी सरकारी व्यवहार करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही. या सुविधांचा योग्य प्रचार करण्यावरही ठइख ने भर दिला आहे.

दरवर्षी ३१ मार्च रोजी आर्थिक वर्ष संपत असल्याने सरकारी खात्यांमधील अंतिम नोंदी, समायोजन आणि लेखापरीक्षणपूर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जातात. त्यामुळे या दिवशी बँकिंग सेवा सुरू ठेवण्याचा निर्णय सरकार आणि वित्तीय व्यवस्थेसाठी महत्त्वाचा मानला जात आहे. हे परिपत्रक आरबीआयचे मुख्य महाप्रबंधक यांच्या कडून जारी करण्यात आले असून, ते देशभरातील सर्व एजन्सी बँकांना लागू करण्यात आले आहे. या निर्णयामुळे वित्तीय वर्षाच्या अखेरीस सरकारी व्यवहार अधिक सुलभ आणि सुरळीत पार पडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

सर्वसामान्यांसाठी...

सभेत बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर विशेष भर दिला. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये विजय मिळवून देणारा खरा कणा म्हणजे कार्यकर्ता आहे. प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता हा पाठीचा कणा असतो. मी जरी उपमुख्यमंत्री असलो, तरी मी मुळात कार्यकर्ता आहे. शिवसेना हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि म्हणूनच मी कार्यकर्त्यांच्या मागे उभा राहणारा नेता आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांच्या निधनाचा उल्लेख करत महाराष्ट्रावर शोककळा पसरल्याची भावना व्यक्त केली.

सरकारच्या योजनांबाबत बोलताना शिंदे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी लखपती योजना, एसटी प्रवासात ५० टक्के सवलत, मुलींच्या उच्च शिक्षणासाठी १०० टक्के फी माफी, शेतकरी सन्मान योजना अंतर्गत दरवर्षी ६,००० रुपये थेट खात्यात जमा, पीक विमा योजना, अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानभरपाईसाठी एनडीआरएफ नियमांमध्ये बदल आणि दुप्पट मदत अशा अनेक योजना सरकारने राबवल्या आहेत.

एका भावनिक घटनेचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, शिक्षणासाठी फी भरू न शकल्याने एका मुलीने आत्महत्या केली होती. त्या घटनेनंतर एका आठवड्यात कॅबिनेटमध्ये प्रस्ताव आणून सरकारने ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के फी माफीचा निर्णय घेतला. मुलगी शिक्षणासाठी आत्महत्या करत असेल, तर सरकारचा उपयोग काय? असा सवाल करत त्यांनी सरकारची संवेदनशीलता अधोरेखित केली.

शेतकऱ्यांबाबत बोलताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शेतकरी हा या राज्याचा मायबाप आहे. राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्याचाच आहे. मराठवाडा दुष्काळग्रस्त भाग असून 'दुष्काळ' हा शब्दच पुसून टाकून दुष्काळमुक्त मराठवाडा घडवायचा आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जवळगाव मध्यम प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देणे, बार्शी उपसा सिंचन योजनेसाठी निधी उपलब्ध करणे आणि अपर तहसील कार्यालय उभारणे या मागण्या त्यांनी तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

तरुणांच्या रोजगारावरही त्यांनी भर दिला. तरुणांनी नोकरीसाठी मुंबई, ठाणे, पुण्याकडे जाऊ नये, त्यांना इथेच रोजगार मिळाला पाहिजे, असे सांगत एमआयडीसी स्थापन करून उद्योग आणण्याचा शब्द त्यांनी दिला. उद्योग, रोजगार आणि स्थानिक विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

वैराग नगरपंचायतीसाठी मोठ्या प्रमाणात विकासकामांची घोषणा करत त्यांनी रस्ते व गटारींसाठी २० कोटी, वैकुंठ स्मशानभूमीसाठी ५ कोटी, सीसीटीव्हीसाठी २ कोटी आणि नगरपंचायत नवीन इमारतीसाठी ७ कोटी, असा एकूण सुमारे ३४ कोटींचा निधी मंजूर करण्याचा शब्द दिला. नगरपंचायतीची चांगली इमारत उभारली पाहिजे, प्रशासनासाठी आवश्यक सुविधा दिल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

सभेच्या शेवटी त्यांनी पुन्हा एकदा आमदार दिलीप सोपल यांच्या कार्याची प्रशंसा करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये त्यांच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. सात वेळा निवडून आलेले दिलीप सोपल साहेब आठव्यांदाही निश्चितच निवडून येतील. त्यांच्या पाठीशी उभे राहा आणि विकासाची गती अधिक वाढवा, असे सांगत त्यांनी सभेचा समारोप केला.

यावेळी सोलापूर जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमरावती शासकीय...

आणि कब्जेहक्काने प्रदान करण्यात आली आहे. जमिनीच्या वापराबाबत शासनाने काही महत्त्वाच्या अटी घातल्या आहेत.महसूल विभागाच्या परवानगीशिवाय या जमिनीची विक्री, देणगी, गहाण किंवा कोणत्याही खाजगी-सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर हस्तांतरण करता येणार नाही.

या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण पश्चिम विदर्भातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होईल.जिल्ह्यातील नागरिकांची ही मागणी होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळू शकले. आरोग्यसेवा म्हणजे ईश्वरसेवा, हा सरकारचा ध्यास आहे. पालकमंत्री या नात्याने मुख्यमंत्र्यांचे मी मनपूर्वक आभार मानतो. - चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री, पालकमंत्री अमरावती.

एक्सप्रेवेवर प्रचंड ....

काही प्रवाशांच्या विमान प्रवासाच्या वेळा चुकल्या असून, उपचारासाठी निघालेले रुग्ण आणि मालवाहतूक करणारी वाहनेही या कोंडीत अडकली आहेत.

वाहतूक कोंडीत अडकलेल्या नागरिकांना पाणी, अन्न आणि स्वच्छतागृहांच्या सुविधांचा अभाव जाणवत असून, दीर्घ प्रतीक्षेमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. आपत्कालीन परिस्थितीत महामार्ग इतक्या काळासाठी बंद राहतो, याबाबत वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आपत्कालीन यंत्रणा, पोलीस आणि महामार्ग प्रशासन युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. सुरक्षिततेचा पूर्ण आढावा घेतल्यानंतरच महामार्ग पूर्णपणे खुला केला जाईल, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तोपर्यंत प्रवाशांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आडोशी बोगद्याजवळील गॅस गळतीच्या घटनेमुळे एक्सप्रेसवे आणि जुना हायवे दोन्ही ठप्प आहेत. प्रवाशांनी कृपया खालील पर्यायी मार्गांचा वापर करावा:

१. ताम्हिणी घाट मार्ग: पुणे पौड ताम्हिणी घाट माणगाव मुंबई. (दक्षिण मुंबईसाठी उपयुक्त)

२. माळशेज घाट मार्ग: पुणे चाकण नारायणगाव माळशेज घाट कल्याण/ठाणे. (उपनगरांसाठी उपयुक्त) कृपया लोणावळा-खंडाळा मार्ग पूर्णपणे टाळावा. प्रवासाचा वेळ ३-५ तासांनी वाढू शकतो, त्यामुळे पुरेसे इंधन आणि पाणी सोबत ठेवावे.

शरदचंद्र पवार...

विलासराव देशमुख यांनी किल्लारी येथे प्रचार सभेत बोलताना केले.

महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेलचे अध्यक्ष श्री यशपाल भिंगे, प्रदेश काँग्रेस सचिव श्रीशैल्य उटगे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवर नेते पदाधिकारी या विशाल सभेस उपस्थित होते. जि प गटातील उमेदवार श्री. सुभाष पांडुरंग पवार, किल्लारी पं.स. गणातील उमेदवार श्री. माधव सुधीर बिराजदार, तळणी पं. स. गणातील उमेदवार श्री. अभिजीत प्रमोद देशमुख यांच्या प्रचारासाठी किल्लारी येथे आयोजित आमदार देशमुख बोलत होते.

सभेच्या प्रारंभी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. लातुर जिल्ह्यातील औसा तालुक्यातल्या किल्लारी जिल्हा परिषद गटातील श्री.सुभाष पांडुरंग पवार,व पंचायत समिती गणातील श्री.माधव सुधीर बिराजदार आणि तळणी पंचायत समिती गणातील श्री.अभिजीत प्रमोद देशमुख या काँग्रेस आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ किल्लारी या ठिकाणी जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आलेले होते. लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारात औसा तालुक्यातील किल्लारी जिल्हा परिषद गट व गण तसेच तळणी पंचायत समिती गणातील काँगेस आघाडीच्या उमेदवाराना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

काँग्रेस पक्षाच्या आदरणीय नेत्यांनी मागच्या ६० -७० वर्षात जे काम उभे केले आहे ते सांगून, विकासाची ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी जनतेचा कौल आम्ही मागत आहोत. त्यावरही अहंकारी मंडळी टीका करताना दिसत आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे भाजपच्या मंडळींचे सूत्र आहे, सर्वत्र भ्रष्टाचार टक्केवारी आणि कमिशनची चर्चा होताना दिसत आहे, जनतेने जागरूक होऊन आता या अहंकारी मंडळाची दुकानदारी बंद करावी, काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही यावेळी आमदार देशमुख यांनी केले.

दरम्यान या जाहीर प्रचार सभेत सुभाष दाजी पवार, श्रीशैल उटगे, प्रा.यशपाल भिंगे यांनी आपले मनोगत व्यक्त करीत काँग्रेस आघाडीच्या सर्व उमेदवाराना बहुमताने विजयी करून लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये पाठवावे आणि आपल्या सेवेची संधी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली.

यावेळीएँड.समदपटेल,किरण बाभळसुरे, केशवराव पाटील, माधव बिराजदार,बाळासाहेब गायकवाड, सचिन पाटील,मारुती पाटील,विनोद बाभळसुरे, चांडपाषा सय्यद,माधव पाटील,एँड.बाबासाहेब गायकवाड, संजय लोंढे, बाळाजी साळुंके,रामदास चव्हाण,एँड श्रीकांत सूर्यवंशी यांच्यासह किल्लारी जिल्हा परिषद गट व गण यासह तळणी पंचायत समिती गणातील मतदार बंधू भगिनी, काँग्रेस आघाडी पदाधिकारी, सदस्य,कार्यकर्ते, महिला भगिनी व परीसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मध्यमवर्गीय

सर्वांगीण विकास होत असल्याचे त्यांनी सांगितले.

येणारी जिल्हा परिषद निवडणूक ही व्यक्तीची नसून, केंद्राच्या ५५ व राज्याच्या ४४ योजनांचा लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ओबीसी, बंजारा व वंचित घटकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार असून, सात तारखेला होणारी निवडणूक विकासासाठी महत्त्वाची असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.विकसित लातूर २०४७ या दृष्टीकोनातून लातूर, निलंगा व किल्लारीचा विकास केला जाणार असून, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर जिल्ह्याला होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लाडकी बहीण योजना बंद होऊ दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली. ज्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता आली, त्या ठिकाणी ही योजना बंद झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवण्यासाठी बिना व्याज, बिना जामीन कर्ज देणारी योजना जाहीर केली आहे. महाराष्ट्राला यावर्षी केंद्र सरकारकडून एक लाख कोटी रुपयांचा निधी मिळणार असून, त्याचा मोठा लाभ मराठवाड्यासह लातूर व धाराशिव जिल्ह्याला होणार आहे.राज्यात लाडकी बहीण योजना सुरू असलेल्या ठिकाणी ती पुढेही चालू राहणार असून, महिलांना पाच लाख रुपयांपर्यंतचे रोजगार कर्ज देऊन स्वयंपूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेमार्फत महिला बचत गटांसाठी व्यावसायिक संकुल उभारून त्यांच्या तयार वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार संभाजी पाटील निलंगेकर व आमदार अभिमन्यू पवार यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून तळागाळातील घटकांना न्याय देण्याची भूमिका भाजपची असल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून २५ वर्षांत २० वर्षे काँग्रेस सत्तेत होती, तर केवळ ५ वर्षे भाजप सत्तेत असूनही त्या काळात भाजपाने सर्व योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना न्याय दिल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सुनेत्रा पवारांचा शपथविधी झाला याचा आनंद; शरद पवार

पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवारांचे बारामतीमधील विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर, अन्त्यसंस्कारावेळी संपूर्ण पवार कुटुंबीय हे एकत्र आले होते. पण, त्यांच्या निधनाच्या तिस-या दिवशीपासूनच राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडल्या. तसेच, या दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा अजित पवारांनी केल्याचा दावाही काही नेत्यांनी केला. त्यामुळे, अनेक राजकीय चर्चा रंगू लागल्या होत्या. याचदरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा कारभार सांभाळला. यावर पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाष्य केले आहे.

बारामती येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांवर भाष्य केले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी अतिघाई केली आणि त्यांनी लगेचच शपथविधीचा कार्यक्रम घेतल्याची टीका होत आहे, याबद्दल विचारले असता शरद पवार म्हणाले की, मला यावर कोणतेही भाष्य करायचे नाही. तसेच, यावेळी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले आहे. यावर शरद पवार म्हणाले की, त्यांना संधी दिली याचा आनंद आहे, असे म्हणत आपली पहिली प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.



अजित पवार यांच्या विमान अपघातावर अनेकांनी शंका व्यक्त केल्या आहेत. याबाबत शरद पवार यांना विचारले असता ते म्हणाले की, अधिकृत माहिती मिळत नाही, तोपर्यंत मी अपघातासंदर्भात उगीचच शंका घेणार नाही असे म्हणत आपले मत मांडले. तसेच, यावेळी त्यांना अजित पवार यांचे स्मारक उभारले जाणार असून त्याबद्दलही विचारण्यात आले. यावर शरद पवार म्हणाले की, 'मीही वर्तमानपत्रात वाचले होते की, आम्ही स्मारक करणार आहोत, पण ही गोष्ट मला माहिती नाही. मी त्या संस्थेचा अध्यक्ष आहे. मला याबद्दल माहिती असली पाहिजे. पण, मी आतापर्यंत याबद्दलची फक्त चर्चा ऐकली आहे. याबद्दल काय करायचं याबद्दल एकत्र बसून चर्चा करू. सध्या चर्चाच झाली नसताना त्याबद्दल भाष्य करणं योग्य नाही.'' असे म्हणत त्यांनी स्मारकाचा मुद्दा सध्यापुरता खोडून काढला.

पक्ष विलीनीकरणाच्या मुद्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवारांचे नाव घेतले होते. यावर शरद पवार म्हणाले की, माझा उल्लेख का केला हे समजले नाही. विलीनीकरणावर अजितदादा आणि जयंत पाटील यांच्यासोबत चर्चा होती. या सगळ्या चर्चेत फडणवीस कुठेच नव्हते, त्यामुळे त्यांना याबद्दल भाष्य करण्याचा कोणताही अधिकार नाही, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्र्यांना टोला लगावला आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

मोडिलिपी ही इतिहास अभ्यास व संस्कृती संवर्धनाचे महत्वाचे साधन - डॉ.कामाजी डक

नांदेड (प्रतिनिधी): शिवकालीन इतिहासाची प्राथमिक साधने असलेली हजारो कागदपत्रे ही मोडी लिपीत असून इतिहासलेखनासाठी ती वाचता येणे अत्यावश्यक आहे, त्यामुळे मोडी लिपी ही इतिहास व संस्कृती संवर्धनाचे महत्वाचे साधन आहे. शिवकालीन व पेशवे काळातील असंख्य मोडीलिपीतील कागदपत्रे आहेत. तसेच मराठ्यात तहसील, भूमिअभिलेख, दुय्यम निबंधक कार्यालयात देखील मोडीलिपीत दस्तऐवज मोठ्या प्रमाणावर आहे. त्या तुलनेत मोडीलिपी जाणकार कमी आहेत. लिप्यंतर कौशल्यातून तरुणांना रोजगाराच्या संधी सुधा उपलब्ध होऊ शकतात असे डॉ. कामाजी डक यांनी प्रतिपादन केले.

पीपल्स कॉलेज नांदेड येथे पदवी व पदव्युत्त इतिहास विभागाद्वारे 'मोडी लिपी प्रशिक्षण' दिनांक २८ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाच्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भानेगावकर, उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड हे होते.

डॉ. डक यांनी चार दिवसामध्ये विद्यार्थ्यांना शिकविलेली मोडीलिपी



बाराखडी, शब्दसंक्षेप, मोडी जोडाक्षरे, कालगणना, मोडी कागदपत्राचे प्रकार याचा सराव विद्यार्थ्यांना सातत्याने करणे आवश्यक आहे. यातूनच वाचन कौशल्य विकसीत होण्यास मदत होईल असे सांगितले.

या समारोप कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना पीपल्स कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.अशोक सिद्धेवाड यांनी प्रशिक्षणार्थींनी सतत चार दिवस उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण केले त्याविषयी सर्वांचे अभिनंदन करून प्रशिक्षक डॉ. कामाजी डक यांच्या मोडी लिपी प्रशिक्षण देण्याच्या पद्धतीने प्रशिक्षणार्थींमधील उत्साहाचे कौतुक करून याविषयी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षिय समारोप प्राचार्य डॉ. एस. जी. भानेगावकर सरांनी कथा, कादंबरी व कविता इत्यादी साहित्य शिकताना जो उत्साह विद्यार्थ्यांत दिसतो तोच उत्साह आज मोडी लिपी वर्गातील प्रशिक्षणार्थ्यांच्यात दिसत असल्यामुळे मोडी लिपी हा विषय रुक्ष नसून तो सुद्धा इंटरेस्टेड असल्याचे निदर्शनास येते असे प्रतिपादन केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी मोडी लिपी प्रशिक्षण आयोजित केल्या बद्दल इतिहास विभागाचे समन्वयक डॉ. विशाल पतंगे यांचे अभिनंदन केले. तसेच प्रशिक्षक डॉ. कामाजी डक यांचे आभार व्यक्त करून प्रशिक्षणार्थीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन इतिहास विभाग समन्वयक डॉ.विशाल पतंगे यांनी केले. या मोडीलिपी प्रशिक्षणात पीपल्स महाविद्यालय, यशवंत महाविद्यालय व शहरातील ८२ प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. शेवटच्या दिवसी विद्यार्थ्यांनी मोडीलिपीतील बाराखडी, भारताचे राष्ट्रगीत, सविधान, शिवगर्जना, हे मोडीलिपीत पोस्टरवर लिहून आणले होते. मा.प्राचार्यांच्या हस्ते विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा ग्रंथ भेट देऊन गौरव करण्यात आला. यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला वाणिज्य विभागप्रमुख डॉ.सी. के. हरणावळे हे आवर्जून उपस्थित होते. तसेच हिंदी विभागातील डॉ.बी. आर. घोडगे, प्रशिक्षणार्थीमध्ये डॉ.शीतल मरवाळीकर, डॉ. पंदिलवाड , प्रा.विजय कदम, प्रा. माया भालेराव, प्रा.दत्ता गच्चे, डॉ.मराठे इत्यादी उपस्थिती होते. इतिहास विभागातील डॉ.एस.जी जाधव, प्रा.स्वाती साळवे , डॉ.डी.आर. आझादे , प्रा. नारायण अंभोरे यांनी मोडी लिपी प्रशिक्षण वर्गासाठी विशेष प्रयत्न केले. या मोडी प्रशिक्षण वर्गाला नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ.प्रवीण पाटील, माननीय दागडिया, मा. दिनानाथ पत्की यांच्या सह इतर विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट दिली.

विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन व बोधचिन्हाचे लोकार्पण



नांदेड (प्रतिनिधी): नांदेड येथे दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या तयारीने वेग घेतला आहे. या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी गुरुगोविंद सिंग स्टेडियम, गाळा क्रमांक १२ येथे संमेलनाच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ समीक्षक व अनुवादक डॉ. भगवंत क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाच्या बोधचिन्हाचे लोकार्पण नांदेडचे सुप्रसिद्ध चित्रकार श्रीरंग केरबाजी खानजोडे यांच्या हस्ते करण्यात आले. हे बोधचिन्ह कलाकार संतोष घोंगडे यांनी साकारले आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. भगवंत क्षीरसागर म्हणाले की, आज समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या लोकशाही मूल्यांची पायमल्ली होत असताना विद्रोही भूमिका घेणे ही साहित्यिक व कलावंतांची नैतिक जबाबदारी आहे. जाती-पाती, वर्गभेद व लिंगभेद यांच्या बुरसटलेल्या चौकटी भेदून तथागत गौतम बुद्धांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवणारी विद्रोही साहित्यपरंपरा समाजाला योग्य दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चित्रकार श्रीरंग खानजोडे यांनी बोधचिन्हाबाबत बोलताना ते विद्रोही विचारांचा वारसा आणि संघर्षशील वाटचालीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी, राज्य संघटक किशोर ढमाले, संमेलनाचे स्वागताध्यक्ष राहुल प्रधान, मुख्य निमंत्रक डॉ. राजेंद्र गोणारकर, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. अनंत राऊत, मुख्य संयोजक शिवाजीराव गावंडे व डॉ. विजयकुमार माहुरे, यशवंत मकरंद, डॉ. बालाजी पोतुलवार, डॉ. विठ्ठल भंडारे,इंजि. विवेक मवाडे, डॉ. संतोष हंकारे, हेमंत कारले,डॉ. जे. टी. जाधव, दिगंबर घायाळे, पवन जगडमवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी केले. सूत्रसंचालन पडॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. भीमराव हटकर यांनी केले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, लेखक, साहित्यिक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपर्क कार्यालय सुरू झाल्यामुळे संमेलनाच्या नियोजन व कार्यवाहीला अधिक गती मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

५ टक्के क्रीडा आरक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'डिजिटल क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीवर नोंदणीचे आवाहन

नांदेड(प्रतिनिधी): राज्यातील गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमधील ५ टक्के क्रीडा आरक्षणाचा लाभ पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, या उद्देशाने शासनाने अत्याधुनिक ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार जुनी कागदपत्रांवर आधारित पडताळणी प्रक्रिया बंद करून 'डिजिटल क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

या प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व अनुदानित एकविध क्रीडा संघटना, पदाधिकारी तसेच संबंधित खेळाडूंनी अनिवार्यपणे नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

सदर शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी व या प्रणालीचा लाभ तळागाळातील खेळाडूंपर्यंत पोहोचावा, यासाठी क्रीडा संचालनालयामार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही तातडीने राबविण्यात येत आहे.

क्रीडा संघटनांसाठी अनिवार्य कार्यवाही :आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा अधिनस्त असलेल्या तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत क्रीडा संघटनांना शासन निर्णयातील तरतुदींची तात्काळ माहिती देणे बंधनकारक आहे.

स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी व गुणपत्रिका विहित नमुन्यात .xlsx फाईल स्वरूपात 'क्रीडा ई-प्रमाण' पोर्टल (https://sports.maharashtra.gov.in/) वर अपलोड करणे आवश्यक आहे.

सदर माहिती संबंधित अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरी (DSC) करून प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

दंडात्मक तरतूद : निर्धारित ७ दिवसांच्या मुदतीत माहिती ब्लॉकचेनवर अपलोड न करणाऱ्या संघटनांचा समावेश स्मार्ट कॉन्ट्रॅक्टद्वारे स्वयंचलितपणे 'डिफॉल्टर' यादीत करण्यात येईल.

अशा परिस्थितीत खेळाडूचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित क्रीडा संघटनेची राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

खेळाडूंच्या नोंदणीबाबत :

जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना नवीन प्रणालीची माहिती देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

खेळाडूंनी आधार-संलग्न आयडीद्वारे 'क्रीडा ई-प्रमाण' पोर्टलवर लॉग-इन करून नोंदणी करणे अनिवार्य आहे.

खेळाडूंनी सादर केलेली माहिती व क्रीडा संघटनांनी ब्लॉकचेनवर अपलोड केलेला रेकॉर्ड हॅश (ठशलेीव क्रीह) यांची प्रणालीद्वारे स्वयंचलित पडताळणी होणार असल्याने, यापुढे खेळाडूंना प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही.

अजित पवार यांना मुरुड येथे श्रध्दांजली

लातूर, - राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात बुधवारी अकाली निधन झाले. त्यांना मुरुड येथे श्रध्दांजली वाहण्यात आली.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीपराव नाडे, सरपंच अमृताताई नाडे, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. अंकुश नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, माजी उपसरपंच हनुमंत नागटिळक, विजय नाडे, माजी सरपंच अभयसिंह नाडे, ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे, अनंत कणसे, लता भोसले, काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक पठाडे, सोसायटीचे चेअरमन वैजनाथ नाडे, लक्ष्मीकांत तवले, आकाश कणसे, अमर मोरे, रवी नाडे, डॉ. हनुमानदास चांडक, गजानन साबळे, शिवलिंग चौधरी, हनुमंत पाटील यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

महावितरणच्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ वीजग्राहकांनी स्विकारला

पर्यावरणस्नेही 'गो-ग्रीन' वीजबिलांचा पर्याय, २८ लाख २७ हजार रूपयांचा आर्थिक फायदा

लातूर, दि.०४ फेब्रूवारी २०२६: वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ईमेल' व 'एसएमएस' चा पर्याय निवडणाऱ्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ लघुदाब वर्गवारीतील वीजग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेचा लाभ घेतला आहे. या वीजग्राहकांना २८ लाख २७ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व WWW.MAHADISCOM.IN संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती. वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला परिमंडलात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत २३ हजार ५६६ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या मध्ये लातूर मंडळातील लातूर विभागातील ५ हजार ७९१ वीजग्राहक, उदगीर विभागातील २ हजार ८०७ वीजग्राहक तर निलंगा विभागातील १ हजार ६८६ वीजग्राहक सहभागी झाले आहेत. तसेच धाराशिव मंडळातील धाराशिव विभागातील ३ हजार ४८८, तूळजापूर विभागातील १ हजार ८०८ वीजग्राहक त्याचबरोबर बीड मंडळातील बीड विभागातील ४ हजार १३४ तर अंबाजोगाई विभागातील ३ हजार ८५२ वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या सर्व सहभागी ग्राहकांना वार्षीक १२० रूपयांची सुट वीजबिलात मीळत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे - महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या WWW.MAHADISCOM.IN या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

एमआयटी फार्मसीचे परीक्षेत यश

लातूर, - नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने घेतलेल्या पदवी फार्मसी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यात येथील एमआयटी सायन्सेस फार्मास्युटिकल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

बी फार्मसी द्वितीय वर्षाची साक्षी गडेराव हिने ९.१७ सीजीपीए गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम आली. अंजली लांडगे, सुमय्या शेख, राजश्री सोनवणे व कोमल साबळे यांनी ८.८३ सीजीपीए गुण घेऊन द्वितीय व वैष्णवी केंद्रे हिने ८.७५ सीजीपीए गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे बी. फार्मसी तृतीय वर्षातील गायत्री जोशी, ८.४६, अक्षता अंकलकोटे ८.१५ आणि ऐश्वर्या येणगे ८ सीजीपीए गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत.

याबद्दल प्राचार्य डॉ. वैजिनाथ डिग्गे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. यावेळी कॅम्पस समन्वयक पृथ्वीराज कराड, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, प्रा. सोनल साळुंके, प्रा. सरोज काळजाचे, प्रा. आदित्य देशमुख, प्रा. चैतन्य शिरसाट, प्रा. प्रतीक ढाकणे, प्रा. नेहा पाटील, प्रा. असलम सय्यद, विठ्ठल फड, ओमकार भिसे, हल्लाळे, बाळू हलकंचे, रवी राठोड, शुभम साखरे, कातकडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

पंजाबमधील महिला सरपंचांनी केला चालुक्य कालीन येरगीचा अभ्यास दौरा

ग्रामस्थांच्या स्वागताने महिला सरपंच झाले भावुक



देगलूर (प्रतिनिधी): पंजाबमधील महिला सरपंचांनी तालुक्यातील चालुक्य काळातील येरगी गावास भेट दिली आणि तेथील ऐतिहासिक वारसा आणि प्राचीन स्थापत्य कलेची माहिती घेतली. येरगी येथे आल्यावर ग्रामपंचायत,बालिका पंचायत राज,विद्यार्थ्यांचे लेझीम पथक आणि ग्रामस्थांनी केलेल्या स्वागताने पंजाबमधील सर्व महिला सरपंच व अधिकारी भारावून गेले . येरगी स्थापत्य कलेचा व विकासाचा अभ्यास करण्यासाठी पंजाब सरकारने त्यांना यशदा पुणे मार्फत पाठवले होते.

बालिका पंचायत राज च्या वतीने स्वागत

पंजाबच्या सर्व महिला सरपंच व पदाधिकारी हे गावात आल्यावर सर्वप्रथम त्यांच्या प्रमुखांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले .

यानंतर बालिका पंचायत राज समितीच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. याप्रसंगी गावातील शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने संगीतमय लेझीम नृत्य सादर करून त्यांचे स्वागत केले.

यावेळी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले, गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे ,

सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे, दत्तात्रेय कुरुंदे,ग्राम पंचायत अधिकारी राजेश तोटावाड

सर्व ग्राम पंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

गावाच्या प्रवेशद्वारावर फुलांच्या पाकळ्यांनी स्वागत

शुक्रवारी, पंजाबच्या महिला सरपंच सकाळी ११.३० वाजता गावात दाखल झाल्या. येरगी बालिका पंचायत आणि गावातील शेकडो महिलांनी गावाच्या प्रवेशद्वारावर सर्व पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. तसेच, बालिका पंचायत ने व गावातील महिलांनी त्यांच्यावर गुलाब आणि इतर फुलांच्या पाकळ्यांची पुष्पवृष्टी केली . या स्वागताने संपूर्ण पाहुणे भारावून गेले होते.

पाहुण्यांच्या हस्ते एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत गावात वृक्षारोपण

येरगी मध्ये एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत चालू असलेले वृक्षारोपण अभियानाची माहिती देऊन रस्त्याच्या दुतर्फा पंजाब च्या महिला सरपंचांच्या हस्ते रोपे लावली.यावेळी बालिका पंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी गावात चालू असलेल्या वृक्षारोपण चळवळीची माहिती सांगितली.

ग्राम सचिवालयात कार्यक्रमाचे आयोजन

सर्व पाहुण्यांचे वाजत गाजत,लेझीम पथकाच्या नृत्याने गावात मिरवणुकीची सांगता झाल्यावर ग्राम सचिवालयाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे ग्रामपंचायतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले होते. याप्रसंगी गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, यशदा पुणे येथील राजू वानखेडे, संतोष पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय कुरुंदे ,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे,ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड, इत्यादी उपस्थित होते.

यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण

गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी केले आणि सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील यांनी गावाची ऐतिहासिक माहिती दिली. ज्यामध्ये ११ व्या शतकातील चालुक्य राजवंशाच्या शासकाचे येरगी निवासस्थान असल्याची माहिती तसेच गावात असलेले प्राचीन स्थापत्य कलेचे अद्भुत ऐतिहासिक वारसा, शिलालेख, केशवेश्वर मंदिर, सरस्वती मंदिर इत्यादींची माहिती देण्यात आली.

यावेळी बालिका पंचायत ची सचिव महादेवी दाणेवार यांनी बालिका पंचायत द्वारे गावात राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. गावातील मुलींच्या सुरक्षेसाठी सरपंच संतोष पाटील यांच्याकडून राबविण्यात आलेल्या कराटे प्रशिक्षण,योग-प्राणायाम,बालविवाह बंदी,गावातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून करत असलेले प्रयत्न आदींची माहिती दिली.

पीपीटीद्वारे दिली गाव विकासाची माहिती

ग्राम सचिवालयात झालेल्या कार्यक्रमानंतर, पाहुण्यांना गावाची शाळा दाखवण्यात आली जिथे पीपीटीने आजपर्यंत ग्रामपंचायतीने गावात केलेल्या कामांची माहिती दिली. वरील माहितीने सर्व पाहुणे प्रभावित झाले आणि पंजाबला गेल्यानंतर त्यांनी पंजाबमध्ये येथील विशेष मोहिम राबविण्याचा संकल्प केला. बालिका पंचायतीने दर रविवारी राबविण्यात येणारे स्वच्छता,अभियान, बालविवाह प्रतिबंध , दारू आणि हुंडाबंदीच्या निर्णयाचे कौतुक केले.

बालिका पंचायत राजने गावात चालवलेल्या विविध मोहिमांची माहिती घेतल्यानंतर, दारूबंदी, हुंडाबंदी, मुलींचे शिक्षण, बालविवाह बंदी इत्यादींबाबत त्यांच्याकडून चालवल्या जाणाऱ्या मोहिमांचे कौतुक केले. आणि सर्व महिला सरपंचांनी बालिका पंचायतीला पंजाबला येण्याचे आमंत्रण दिले. अवघ्या तासातच बालिका पंचायत व अन्य महिला पंजाबच्या महिला सरपंचा सोबत मिसळल्या आणि त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

पंजाबच्या सरपंचांनी गावातील स्वच्छतेचे केले कौतुक पीपीटीची माहिती घेतल्यानंतर सर्व पाहुण्यांनी गावात फेरफटका मारली. त्यांना चालुक्य काळातील सर्व मंदिरे आणि गावात असलेल्या त्यांच्या कलाकृतींची माहिती दिली . गावात भेट देताना त्यांनी गावात दिसणाऱ्या स्वच्छतेचे कौतुक केले आणि गावात दर रविवारी होणाऱ्या स्वच्छता मोहिमेची माहिती घेतली. त्यांना गावात असलेल्या चालुक्य काळातील १८ विहिरी आणि २ बारवांची माहिती मिळाली आणि चालुक्य काळातील पाणीपुरवठा योजनेच्या अद्भुत स्थापत्यकलेमुळे प्रभावित झाले. तसेच, या प्राचीन विहिरींमधील पाणी पिऊन त्यांनी ते अतिशय गोड असल्याचे सांगितले. पंजाबमधील महिला सरपंचांनी सकाळी ११.३० ते सायंकाळी ४.३० पर्यंत वेळ दिला आणि गावातील महिलांमध्ये मिसळल्या आणि येरगीहून निघताना त्यांचे डोळे अश्रूंनी भरले होते. त्यांनी सांगितले की आजपर्यंत आम्हाला इतरत्र कुठेही असे प्रेम,आदर मिळाला नाही.

कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी मरखेल पोलिस स्टेशन चे सहायक पोलिस निरीक्षक आर. एम. हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच आरोग्य विभाग, महावितरण कर्मचारी, कृषी विभाग, तहसील कार्यालय, शाळेतील शिक्षक आणि महिला शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील, ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड,सर्व ग्राम पंचायत सदस्य ,शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी,बालिका पंचायत चे सर्व पदाधिकारी,शाळेतील शिक्षकवृंद आणि सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



विद्यार्थ्यांनी जबाबदारीचे भान ठेवून काळाच्या पुढे राहून यशस्वी वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते : उप अधिक्षक समिरसिंह साळवे

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना जबाबदारीचे भान ठेवून स्पर्धेच्या युगामध्ये चालू घडामोडीचा अभ्यास कायम ठेवावा आणि काळाच्या पुढे राहून यशस्वी जीवन जगावे. आपल्या मनातील विचारांना निर्भिडपणे मांडून आपल्यातील सर्वांगिण विकासाला संधी द्यावी आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये यशस्वीपणे वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन उप अधिक्षक समिरसिंह साळवे यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज एमआयडीसी, लातूर येथे आयोजित करीअर गाईडन्स व इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, उपप्राचार्य विठ्ठल चेवले, उपप्राचार्य संजय अंकुश, उपप्राचार्य मनोज गायकवाड, प्रा.सूरेश सुडे, प्रा.वैजनाथ जाधव, प्रा.हणमंत बद्दे, प्रा.निवृत्ती गौंडगावे, प्रा.अंजली आकुसकर, प्रा.विरेश स्वामी, प्रा.प्रशांत बेडगे, प्रा.परमेश्वर भंगे, प्रा.सुधाकर दर्शने, प्रा.सुचिता घाडगे, संभाजी मोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना उप अधिक्षक समिरसिंह साळवे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील मळकटलेल्या कपड्यावर राब-राबतात. माझा मुलगा आज ना उद्या साहेब होईल. या आशेवर ते जगत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही आपल्या अंगी असलेल्या जिद्द, चिकाटी व ध्येय समोर ठेवून शिक्षणाचा जागर कायम ठेवून कार्य केल्यास अपेक्षित यश मिळते. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षेचा मार्गही निवडावा आणि त्यातून मिळणाऱ्या यशाच्या आधारे आपल्या आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्नशील रहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा सन्मान संयोजन समितीच्यावतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार सुचिता घाडगे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या ज्ञानप्राप्तीसाठी सकारात्मक वापर करावा -प्राचार्य गोविंद शिंदे महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यासाला महत्त्व देऊन आधुनिक तंत्रज्ञानाच्या ज्ञानप्राप्तीसाठी सकारात्मक विचार करावा आणि एक सुजान नागरिक म्हणून समारे यावे. असे आवाहन प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले तर प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांनी नीट,जेईई, सीईटी तयारी सोबतच स्पर्धा परीक्षेला सामोरे जाऊन प्रशासकीय सेवेत सहभागी होऊन अधिकारी बनावे, असे आवाहन केले.

खेळ व कला हे विध्यार्थी जीवनाचे अविभाज्य घटक : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

कृषि महाविद्यालय, लातूर येथे क्रिडा सप्ताहास प्रारंभ

दै. अदिती एक्सप्रेस



लातूर : कृषि महाविद्यालय, लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कला व क्रिडा गुणांना वाव मिळावा या हेतूने क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे मा.कुलगुरू इंद्र मणि व संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार करण्यात येते. यावर्षी क्रिडा स्पर्धा दि:०३/०२/२०२६ ते दि:०९/०२/२०२६ या दरम्यान आयोजित करण्यात आल्यामुळे आज दि:०३/०२/२०२६ रोजी क्रिडा स्पर्धांचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय, लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, उद्घाटक म्हणून राष्ट्रपती पदक प्राप्त सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सय्यद रहमान तर प्रमुख अथिती म्हणून डॉ. व्यंकट जगताप, जिमखाना उपाध्यक्षा डॉ.ज्योती देशमुख, डॉ. विजय भामरे व डॉ.राजेश शेळके हे उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले खेळ हे एकमेव संघभावना वृद्धिंगत करणारी गोष्ट आहे. खेळातून राष्ट्रीय एकतेची कल्पना प्रत्यक्षात येवून देशप्रेमाची भावना जोपासली जाते. ते पुढे असेही म्हणाले की, हार, जीत हा कुठल्याही खेळाचा अविभाज्य भाग असून हार व जीत झाली तरी परस्परांबद्दल नेहमी आदरभाव ठेवून विद्यार्थ्यांनी खिलाडुवृत्ती जोपासावी तसेच खेळ व कला हे विध्यार्थी जीवनाचे अविभाज्य घटक आहे. उद्घाटक सय्यद रहमान म्हणाले की, विद्यार्थी, विद्यार्थीनींनी नियमित खेळ खेळले पाहिजेत, त्यातूनच तुमचा संपूर्ण विकास होवून उद्याचे सशक्त व तंदुरुस्त नागरिक तयार होवू शकतात असे सांगून त्यांनी खेळाडूंनी कायमच पंचांच्या निर्णयाचा आदर करावा हा मोलाचा सल्ला सुद्धा दिला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते क्रिकेट इत्यादी स्पर्धांचे उद्घाटन होवून क्रिडा सप्ताहाचा प्रारंभ झाल्याचे उद्घोषित करण्यात आले. तसेच यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या क्रिकेटच्या क्रिडा स्पर्धा पार पडल्या तसेच या क्रिडा सप्ताह मध्ये कबड्डी, हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, रस्सीखेच,बुद्धिबळ व फुटबॉल इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.सचिन पडवळ यांनी केले. यावेळी डॉ.अनंत शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. अनिलकुमार कांबळे, डॉ.नितीन तांबोळी, डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर, , डॉ. भगवान कांबळे, डॉ. वैभव कांबळे, नामदेव खटिंग, उत्तम पवार, दिपक जाधव, नितीन देवकते यांनी सहकार्य केले. विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या बहुसंख्य उपस्थितीने क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन पार पडले.

भाजपच्या भ्रष्टाचाराचा कासरा आवळण्याची हीच ती योग्य वेळ : लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख



दै. अदिती एक्सप्रेस

निलंगा : लातूर जिल्हा परिषद भाजपच्या ताब्यात असताना जिल्ह्यात कोणतेही ठोस विकासकाम झाले नसून अनेक विकास योजना केवळ कागदावरच राबवण्यात आल्या. या योजनांमध्ये भाजप पदाधिकारी व त्यांच्या नेत्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, काँग्रेस नेते धिरज विलासराव देशमुख यांनी केला.

निलंगा तालुक्यातील लांबोटा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील उजेड येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित काँग्रेस उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मतदारांनी आपल्या मताची ताकद ओळखावी, असे आवाहन केले. रेल्वे बोगी कारखान्याच्या माध्यमातून स्थानिक बेरोजगार युवकांना नोकऱ्या दिल्या जातील, असे आश्वासन भाजपकडून देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात एकाही युवकाला नोकरी मिळाली नाही यामुळे युवकांची फसवणूक भाजप कडून करण्यात आल्याचे धिरज देशमुख यांनी सांगितले. याउलट लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच मांजरा परिवारातील साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाला चालना दिली असून या माध्यमातून शेतकरी व शेतमजुरांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडून आले असल्याचे त्यांनी नमूद केले. भाजपच्या भ्रष्टाचाराचा कासरा आवळण्यासाठी हीच योग्य वेळ असून येत्या ७ तारखेला काँग्रेसच्या 'हात' चिन्हाला साथ देण्याचे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले. यावेळी काँग्रेसचे नेते अशोकराव पाटील निलंगेकर, जिल्हा अध्यक्ष अभय साळुंखे यांच्या सह काँग्रेस उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारत-अमेरिका व्यापार करार शेतक-यांचे कंबरडे मोडणारा; राजू शेट्टींचा हल्लाबोल

कोल्हापूर : प्रतिनिधी- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी रात्री उशिरा, बहुप्रतीक्षित भारत-अमेरिका व्यापार कराराची घोषणा केली. याअंतर्गत भारतावर लादण्यात आलेला करही १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. दरम्यान आता भारत अमेरिकेकडून अनेक वस्तू खरेदी करणार आहे. दरम्यान, आता या करारावर माजी खासदार राजू शेट्टी यांनी टीका केली.

''हा व्यापार करार मंजूर झाला, तर भारतातील शेतकरी आणि दुग्धोत्पादकांचे कंबरडे मोडेल. हा करार म्हणजे थेट भारतीय शेतक-याच्या मृत्यूला दिलेली संमती आहे,'' असा गंभीर आरोप राजू शेट्टी यांनी केला.

राजू शेट्टी म्हणाले की, या करारामुळे अमेरिकन शेतक-यांनी उत्पादित केलेला मका, सोयाबीन, दुग्धजन्य पदार्थ, कापूस आदी उत्पादने मोठ्या प्रमाणावर भारतात आयात केली जातील. परिणामी, देशातील शेतक-यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळणार नाही आणि देशांतर्गत बाजारपेठ उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. ''अमेरिकन शेतीला मोठ्या प्रमाणात सबसिडी मिळते. अशा परिस्थितीत भारतीय शेतकरी स्पर्धा कशी करणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या कराराचा सर्वाधिक फायदा मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांना होणार असल्याचा आरोप करत शेट्टी म्हणाले, ''हा करार मुकेश अंबानी आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्यासारख्या उद्योगसमूहांना लाभदायक ठरेल. मात्र भारतीय साखर उद्योग, दुग्धव्यवसाय आणि लघु शेतकरी पूर्णपणे मोडून पडतील.''

यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींवरही टीका केली. डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर आमच्या '५६ इंच छातीच्या' पंतप्रधानांनी नांगी टाकून या करारावर सही केली, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे,'' असा आरोप त्यांनी केला. हा करार देशहिताचा नसून परदेशी आणि कॉर्पोरेट हितसंबंध जपणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

राजू शेट्टी म्हणाले, हा करार मंजूर झाला तर आता डोनाल्ड ट्रम्प यांना भारतात बोलावून एकदा भारतीय शेतक-याचे श्राद्ध घालणे एवढेच बाकी राहील, अशा तीव्र शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.



या मुद्यावर शेतकरी संघटनांनी एकत्र येऊन आंदोलन करण्याची गरज असल्याचे सांगत, राजू शेट्टी यांनी देशभरातील शेतक-यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले. ''हा करार मागे घेतला नाही, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याशिवाय पर्याय राहणार नाही,'' असा इशाराही त्यांनी दिला.

शरद पवारांनी व्यक्त केली चिंता

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. त्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील कराराची जागतिक पातळीवर चर्चा आहे. या कराराचे चित्र स्पष्ट होण्यासाठी आणखी २ दिवस लागतील. परंतु या कराराचा परिणाम भारतीय कृषि उत्पादनावर होण्याची शक्यता आहे असे सांगत शरद पवारांनी करारावर चिंता व्यक्त केली. शरद पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, जागतिक पातळीवर अमेरिकेने भारतावर जे कर आकारले होते त्यात काही प्रमाणात कर कपातीचा निर्णय घेतला आहे. मला काही गोष्टींची चिंता आहे. अमेरिका आणि भारतातील या नव्या कराराचे स्पष्ट चित्र आणखी २ दिवसांत देशासमोर येईल. त्यानंतर त्यावर सविस्तर भाष्य करणे योग्य होईल. परंतु आज जे लोकांसमोर अमेरिकेकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यात कृषी क्षेत्रात अमेरिकेला निर्यात करता येईल अशी तरतूद आहे. ही तरतूद भारतातील कृषी क्षेत्राच्या दृष्टीने चिंता करण्यासारखी आहे. अमेरिका हा शक्तिशाली देश आहे. आर्थिक ताकद त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांनी एखाद्या क्षेत्रातील उत्पादनाची निर्यात इतर देशात करायची ठरवली तर त्या देशाच्या त्या क्षेत्रातील उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. ती स्थिती भारतीय शेतीच्या बाबतीत येऊ नये अशी अपेक्षा आहे असे त्यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी टीका करण्यापेक्षा मागच्या ९ वर्षात जनतेसाठी काय केले? हे सांगावे

वलांडीच्या सभेत आमदार अमित देशमुखांचा भाजपवर घणाघाती प्रहार

दै. अदिती एक्सप्रेस



वलांडी (देवणी) - लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी माझ्यावर टीका करण्यापेक्षा मागच्या ९ वर्षात जनतेसाठी काय केले? हे सांगावे. खरे तर त्यांच्याकडे सांगण्यासारखे काहीच नाही. भ्रष्टाचार टक्केवारी आणि कमिशनच्या नादात जनतेच्या योजना या मंडळींनी लुटून खाल्या आहेत. त्यामुळे मतदार बंधू-भगिनींनी या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या लोकाभिमुख उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी देवणी तालुक्यातील वलांडी येथे आयोजित सभेत बोलताना केले.

लातूर जिल्हा परिषद आणि देवणी पंचायत समिती निवडणुकीतील काँग्रेस आघाडीचे वलांडी जि. प. गटातील उमेदवार सौ. अंजली अजित बेळकोने, वलांडी पं.स गणातील उमेदवार उमेश अमृतराव बिरादार, विळेगाव पं.स गणातील उमेदवार नागनाथ दत्तात्रय सगर, बोरोळ जिल्हा परिषद गटातील उमेदवार औदुंबर रामदास पांचाळ, तळेगाव गणातील उमेदवार सौ प्रणिता रोहित चामले, बोरोळ गणातील उमेदवार राहुल केशवराव बालूरे, जवळगा गटातील उमेदवार विकास उर्फ सोनू चनबसप्पा डगवाले, जवळगा पं. स. गणातील उमेदवार सौ. सुरेखा यशवंत सोनकांबळे, दवनहिप्परगा गणातील उमेदवार सौ. प्रभावती ज्ञानोबा पाटील, यांच्या प्रचारार्थ आज सायंकाळी वलांडी येथील आयोजित प्रचार सभेस उपस्थित होते याप्रसंगी आमदार देशमुख बोलत होते.

यावेळी पूढे बोलतांना माजी मंत्री, आमदार देशमुख म्हणाले, लातूर जिल्ह्यातील आदरणीय नेते शिवराज पाटील चाकूरकर साहेब, आदरणीय डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेब, यांनी आपल्या कर्तुत्वाचा ठसा देश पातळीवर उमटवला आहे, लातूर जिल्ह्याच्या निर्मितीपासून या जिल्ह्याला विकसित जिल्हा म्हणून ओळख निर्माण करून देण्याचे काम त्यांनी केले आहे, त्यामुळे त्यांचे नाव सांगून आम्ही या निवडणुकीत मते मागत आहोत. तेही भाजपच्या मंडळींना आवडत नाही, या नेत्यांच्या आठवणी पुसण्याची भाषा ते करीत आहेत, लातूरच्या मतदारांना भाजप नेत्यांची ती भाषा रुचलेली नाही. परिणामी नुकत्याच पार पडलेल्या लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसचा झेंडा फडकला आहे. आत्ता काँग्रेसचा तिरंगा झेंडा जिल्हा परिषदेवरही फडकणार आहे, असा विश्वास यावेळी बोलताना व्यक्त केला. भाजपच्या नेत्यांच्या भूलथापा आणि दिशाभूल करून मते मागण्याच्या राजकारणाला आता जनतेने भीक घालूनये असे सांगून भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि विकासाभिमुख कारभारासाठी लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती त्यांच्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन यावेळी शेवटी बोलताना त्यांनी केले.



यावेळी बोलताना अशोकराव पाटील निलंगेकर यांनी भाजपला खुले आव्हान दिले. विरोधकांनी मागील काळात जिल्हा परिषदेत किती निधी आणला आणि कुठे खर्च केला याची श्वेतपत्रिका काढावी, आम्ही आमच्या काळातील कामांचा हिशोब देतो. केवळ लोकांची दिशाभूल करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवा, असे त्यांनी आवाहन केले. या सभेला जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, दिलीप पाटील नागराळकर, डॉ. अरविंद भाताम्बरे, हमीद भाई शेख, विजयकुमार पाटील,चक्रधर शेळके,रामभाऊ भंडारे,राविकिशन कारखाने, भागवानराव पाटील, अंबादास दानवे,हकीम भाई बौडीवाले,मुश्ताक कादरी,सचिन बेंजर्गे,इसरार सगरे,नागनाथ सगरे यांच्यासह उजनी जिल्हा परिषद गट व गण यासह शिवली पंचायत समिती गणातील मतदार बंधू भगिनी, काँग्रेस आघाडिचे पदाधिकारी,सदस्य, कार्यकर्ते, महिला भगिनी व परीसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर ग्रामीण भाजपचे प्रमुख पदाधिकारी अनंत कणसे यांची भाजपला सोडचिठ्ठी

दै. अदिती एक्सप्रेस

मुरुड /लातूर- भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीणमधील महामंत्री तथा मुरूड ग्रामपंचायत सदस्य अनंत कणसे यांनी आपले सहकारी रामकृष्ण कर्ण पुदाले,विनोद पुदाले,सुभान सय्यद,रंजित धाकतोडे, इर्शाद तांबोळी,चंद्रकांत निचळे,अमोल पिंपरे,महाविर टिळक व शेकडो समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ मुरूड येथे आयोजित सभेत, लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी बोलताना अनंत कणसे म्हणाले की, मागील बावीस वर्षांपासून मी भाजपमध्ये निष्ठेने काम करत आलो आहे मात्र पक्षात कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नव्हती. मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांची कदर न करता, त्यांना डावलले जात होते. विकासाचे राजकारण करण्याऐवजी लातूर ग्रामीणचे आमदार केवळ देशमुख कुटुंबाविरोधात द्वेषाचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यामागे धिरज विलासराव देशमुख यांचे नेतृत्व, विकासाची दृष्टी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना दिले जाणारे प्रोत्साहन हे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, शेतकरी, युवक आणि महिलांसाठी ठोस काम करणारा पक्ष म्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी अनंत कणसे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. ते म्हणाले, काँग्रेस हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येकाला येथे सन्मान मिळतो. येणाऱ्या काळात लातूर ग्रामीणचा विकास अधिक गतीने करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल. या पक्षप्रवेशामुळे लातूर ग्रामीण तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमास काँग्रेसचे पदाधिकारी, स्थानिक नेते, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सभेदरम्यान काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.